Downloaded From : http://cbseportal.com/

This Question Paper consists of 37 questions 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

**Code No.** 59/S/O/M
कोड नं.

Roll No.
अनुक्रमांक

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

**Set /** सेट A

# मराठी
## (204)

Day and Date of Examination ..........................................
(परीक्षेचा दिवस आणि तारीख)

Signature of Invigilators 1. ..........................................
(निरीक्षकाची सही)

2. ..........................................

**सामान्य अनुदेश :**

1. परीक्षार्थी प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपाकरून प्रश्न-पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर-पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
5. उत्तर-पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
5. आपल्या उत्तर-पत्रिकांवर प्रश्न-पत्रिकेचा कोड संख्या 59/S/O/M सेट A लिहावेत.



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

# मराठी
# (204)

वेळ : 3 तास ] [ एकूण गुण : 100

**निर्देश :** (i) **सगळे** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) **सर्व** प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहा.

(iii) प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

**1.** मराठी दुसरीच्या वर्गात एकूण किती मुले होती? 1

(A) चाळीस (B) पंधरा

(C) बारा (D) दहा

**2.** टिळकांच्या मते आपण मराठी भाषेचा स्वीकार केला आहे कारण... 1

(A) ती इंग्रजीपेक्षा चांगली भाषा आहे

(B) मराठी भाषा आपल्याला आवडते

(C) आपल्याला जन्माबरोबर प्राप्त झाली आहे

(D) मराठी बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे

**3.** भारतात स्त्रियांनी कोणते काम अधिक केले आहे? 1

(A) धर्मरक्षणाचे (B) व्रतवैकल्याचे

(C) संस्कारांचे (D) स्वयंपाकाचे

**4.** ''फुलबाग मला हाय पारखा झाला.'' असे कवीने कोणाला उद्देशून म्हटले आहे? 1

(A) सागराला (B) ईश्वराला

(C) सरितेला (D) आईला



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

**5.** समुद्रातील दगडाच्या आसनावर बसून अगस्त्याने कोणत्या मंत्राचा घोष केला? 1

(A) देवीचा (B) गणपतीचा

(C) गायत्रीचा (D) सूर्याचा

**6.** अखंड सावधान असावे। _____ कदापि नसावे. 1

(A) निश्चिंत (B) संचित

(C) स्थिरचित्त (D) दुस्चित्त

**7.** समाज कंटकांच्या दृष्टीने अण्णांनी कोणते घोर पातक केले? 1

(A) स्त्रियांच्या उन्नतीसाठी संस्था काढली (B) मुकाट्याने जन्मभर चालत राहिले

(C) एकच गोष्ट आजन्म केली (D) एका विधवेशी पुनर्विवाह केला

**8.** वीरपत्नी पतीच्या भाळी कोणता तिलक लावणार आहे? 1

(A) विजयतिलक (B) कुंकुमतिलक

(C) शुभतिलक (D) तिलक

**9.** योग्य वाक्प्रचार लिहून वाक्य पूर्ण करा. शिरीष व गोपाळ दोघे मित्र व शेजारी. शिरीष रात्रंदिवस गोपाळकडेच राही. एक दिवस दोघांचे कडाक्याचे भांडण झाले तेव्हा शिरीषचा भाऊ म्हणाला... 1

(A) आकाशपाताळ एक केले (B) कामापुरता मामा

(C) अति तेथे माती (D) इकडे आड तिकडे विहीर

**10.** खालीलपैकी कोणता शब्द शुद्ध आहे? 1

(A) इश्वर (B) ईश्वर

(C) इस्वर (D) इसवर

**11.** खालीलपैकी कोणत्या वाक्यात उभयान्वयी अव्यय वापरले आहे ते ओळखा? 1

(A) जिलेबी स्वादिष्ट झाली होती आणि भाज्याही चटकदार झाल्या होत्या

(B) वर्गात मुलांचा गोंगाट चालू होता

(C) तिच्या मुखावर प्रसन्नता पसरली

(D) "शाबास! असेच यश तुला नेहमी मिळो!"



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

**12.** खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :

विद्येमुळे जे लोक थोर झाले, त्यांनी श्रेष्ठपणा मिळविला, ते सर्वच्या सर्व फार बुद्धिमान होते असे दिसून येत नाही. त्यातील काहींनी तर आपण सर्वसामान्य बुद्धिमत्तेचे विद्यार्थी होते, असे स्वतःच सूचित केले आहे. महात्मा गांधीजीना लहानपणी अभ्यासात एखाद बक्षिस किंवा शिष्यवृत्ती मिळाली तर त्यांना आश्चर्य वाटे; पण आपला अभ्यास सुधारण्यासाठी त्यांनी खूप वाचन केलं, पाठांतर केलं आणि आपल्या शिक्षकाकडून होणाऱ्या शिक्षेला आपण पात्र होऊ नये याची त्यांनी फार काळजी घेतली. उशीरा का होईना पण आपले हस्ताक्षर सुधारण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला. म्हणून तुम्हां विद्यार्थ्यांकरता महात्मा गाधींनी असं लिहून ठेवलं आहे की 'खराब अक्षर हे अर्धवट शिक्षणाची निशाणी आहे आणि चांगले अक्षर ही विद्येची आवश्यक अंगे आहेत.'

विद्यार्थ्यांनी प्रथम आपले हस्ताक्षर सुंदर, मोहक बनवलं पाहिजे, असा समर्थ रामदासांचा आग्रह होता. ''ज्याचं वय लहान आहे, त्या मुलानं इतक जपून काळजीपूर्वक लिहावं की, त्याचं अक्षर पाहूनच लोक मोहित व्हावेत.'' असा समर्थांनी तुम्हाला जो प्रेमळ उपदेश केला आहे, तो नित्य ध्यानी असू द्या.

**प्रश्न :–**

*(i)* महात्मा गांधींनी विद्यार्थीदशेत कोणते परिश्रम केले? 2

*(ii)* सर्वसामान्य विद्यार्थ्याला लेखकाने कोणता दिलासा दिला आहे? 1

*(iii)* हस्ताक्षराबद्दल समर्थ रामदासांचा कोणता आग्रह होता? 1

**13.** खालील काव्यांश लक्षपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या शब्दांत लिहा.

**काव्यांश**

जे कां रंजले-गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले ।। १ ।।
तोचि साधु वोळखावा। देव तेथेचि जाणावा ।। २ ।।
मृदू सबाह्य नवनीत। तैसे सज्जनांचे चित्त ।। ३ ।।
ज्यांसि आपंगिता नाही। त्यांसि धरी जो हृदयी ।। ४ ।।
दया करणे जे पुत्रांसी। तेचि दासा आणि दासी ।। ५ ।।
तुका म्हणे सांगू किती। त्याचि भगवंताच्या मूर्ति ।। ६ ।।

**प्रश्न :–**

*(i)* या अभंगाची रचना कोणी केली आहे? 1

*(ii)* सज्जन लोकांचे मन कसे असते? 1

*(iii)* खरा साधू कसा ओळखावा? 1

*(iv)* देवस्वरूप माणसे कोणास म्हटले आहे. 1



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

**14.** डोंबारी स्त्रियांची तुलना लेखकाने इतिहासातील कोणत्या स्त्रीबरोबर केली आहे? 1

**15.** झोपेतून उठविण्यासाठी नागू बायकोला काय उपाय करायला सांगे? 1

**16.** 'श्री' वर लेखकाचे प्रेम का आहे? 1

**17.** (अ) आचार्य विनोबांच्या मते आईचे मातृत्त्व नेमके कशात आहे? 2

(ब) मुलीचा सासरा तिला का नांदवत नाही? 2

**18.** (अ) डॉ. कलाम कोणते आवाहन करतात? 3

(ब) डॉ. हेगडेवार कोणत्या गोष्टींमुळे अंतर्मुख झाले? 3

**19.** "अगं, असे झालेच पाहिजे, संसारात हीच तर मजा आहे." असे कोणी कोणास म्हटले आहे? 1

**20.** (अ) कन्याकुमारी येथील सूर्यास्तानंतर सभोवतालच्या वातावरणामध्ये लेखकाला कोणता बदल होताना दिसला? 3

(ब) समाजकंटकांनी महर्षी कर्वे यांचा छळ का व कसा केला? 3

**21.** श्रावणमासात कोणत्या फुलांना पाहताच सत्यभामेच्या मनातील रोष मावळला? 1

**22.** 'एका तळ्यात होती' या कवितेतील एका बदकाचे वर्णन कवीने कसे केले आहे? 1

**23.** 'सागरास' कवितेतील कवीला कोणता तारा प्रिय आहे? 1

**24.** (अ) 'बोणं' म्हणजे काय व ते कशासाठी शिजवले जाते? 2

(ब) 'सभाजीराजांना पत्र' या कवितेतून संत रामदासांनी शिवाजी महाराजांचे कोणते गुणविशेष सांगितले आहेत? 2

**25.** 'पाऊलचिन्हे' कवितेत कवी नक्षत्रांना कोणता प्रश्न विचारतात? 1



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

**26.** (अ) 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे'. असे कवीला का वाटते? 3

(ब) ज्ञानेश्वरांनी देवाकडे कोणते दान मागितले? 3

**27.** (अ) देशाचा भाग्यसूर्य तळपत ठेवण्यासाठी कवी देश बांधवांना काय करायला सांगतो? 3

(ब) हजारो वर्षानंतर कोण कुणाला लाभले? 3

**28.** 'पुढील म्हणींचा' अर्थ लिहून स्वतःच्या वाक्यात म्हणींचा उपयोग करा. [कोणती ही एक म्हण] 1

*(i)* तोंड दाबून बुक्क्यांचा मार.

*(ii)* आंधळे पळते व कुत्रे मीठ खाते.

**29.** पुढे दिलेल्या शब्दसमूहाबद्दल **एक** शब्द सुचवा? ½ + ½ = 1

*(i)* सत्याचा आग्रह धरणारा.

*(ii)* अजिबात शत्रू नसलेला.

**30.** पुढील वाक्ये वाचून त्यातील क्रियापद व काळ ओळखा? ½ + ½ = 1

*(i)* सौरभ अमेरिकेला गेला.

*(ii)* मी पुस्तक वाचणार.

**31.** तुमची परीक्षा जवळ आलेली आहे, सर्व विषयांच्या अभ्यासासंबधी तुमच्या मित्रांशी झालेला संवाद लिहा. 4

**32.** खालीलपैकी कोणत्याही विषयावर [200] दोनशे शब्दांत निबंध लिहा. 10

*(i)* माझा आवडता ऋतू

*(ii)* मातृभाषेचे महत्त्व

*(iii)* मला देव भेटला तर!

*(iv)* फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

**33.** या पाठ्यपुस्तकातील कोणता पाठ तुम्हाला जास्त आवडला? का आवडला? त्या पाठाचे नाव व लेखकाचे नाव लिहा. 4

**34.** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. [पत्रलेखनाचे नियम कटाक्षाने पाळा.] 8

*(i)* तुमच्या मित्राला दिवाळीच्या सुटीत तुमच्याकडे येण्याविषयी पत्र लिहा.

*(ii)* तुमच्या परिसरातील विजेचे दिवे लागत नसल्याने अंधार असतो. रस्त्यावरील दिवे लावण्यासाठी ग्राम-पंचायत/नगरपालिका यांना पत्र लिहून कळवा.

*(iii)* तुमच्या शाळच्या ग्रंथालयासाठी पुस्तके मागविण्यासाठी सरस्वती पुस्तक भांडार, भाऊ दाजी लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई 400033, यांना पत्र लिहा.

**35.** (अ) खाली दिलेल्या शब्दांचे **दोन-दोन** समानार्थक शब्द लिहा. 2

*(i)* अरण्य

*(ii)* वडील

(ब) पुढील शब्दांचे विरुद्धार्थ शब्द लिहा. 2

*(i)* अजाण

*(ii)* असली

*(iii)* उपकार

*(iv)* आस्तिक

**36.** पुढील उतारा लक्षपूर्वक वाचा व स्वतःच्या भाषेत त्याचे (एक तृतियांश) सारांशलेखन करा. त्याला योग्य शीर्षक द्या : 4

**उतारा :-**

ललित लेखकाने हरतऱ्हेची माणसे आणि स्थळे पाहिली पाहिजेत. सज्जनांप्रमाणेच दुर्जनांचेही वेगवेगळे नमुने त्याने अवलोकन करुन ठेवले पाहिजेत. राजांच्या राजप्रासादाप्रमाणेच जंगलातली खोपरीही त्याच्या पाहण्यात आली पाहिजे. मनुष्यस्वभावाच्या हजार तऱ्हांची त्याच्याजवळ नोंद पाहिजे. उदात्त प्रसंगाप्रमाणेच



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS

Downloaded From : http://cbseportal.com/

गलिच्छ प्रसंगांचे हजार प्रकार त्याच्या अवलोकनात यावयास पाहिजेत. लेखकाचे अवलोकनाचे क्षेत्र संकुचित असले की, त्याच्या साहित्यकृतीमध्ये विविधता दिसत नाही. आणि ती कृती कंटाळवाणी वाटू लागते. चांगल्या लेखकांचा मोठेपणा हा सरळ अंतःकरणाला भिडणाऱ्या त्यांच्या भाषेत असतो. तसेच त्यांच्या मार्मिक सुधारकी विचार सरणीत असतो. मोठमोठ्या लेखकांच्या कल्पनांची झेपच वाघासारखी पल्लेदार असते. कारण त्यांचे अवलोकनाचे क्षेत्र फारच दांडगे असते.

**37.** खालील माहितीच्या आधारे तालिका बनवा. 4

एका विद्यार्थ्याने अभ्यासाचे वेळापत्रक करावयाचे ठरविले. तो सकाळी दोन तास 8 ते 10 असा अभ्यास करतो. गणित, विज्ञान, इंग्रजी यांचा अभ्यास सकाळच्या वेळेत तर मराठी, हिंदी व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास संध्याकाळच्या वेळेत करावयाचे ठरविले. रविवारी सर्व विषयांची उजळणी करावी असे ठरविले त्याचे वेळापत्रक आखण्यासाठी तालिका तयार करा.

★★★



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : NIOS